सत्र खटला क्र. १२/२०२२
सरकार -वि- मोहम्मद शकिल
निशाणी क्रमांक-५६

## सरकारतर्फे साक्षीदार क्र.०४ याची जबानी

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की

**माझे नांव - अशोक मानसिंग चव्हान**
**वय - ६५ वर्ष, व्यवसाय – शेती,**
**राहणार - गुळबेली, ता. मोताळा, जि. बुलढाणा.**

## अभियोग पक्षातर्फे सरतपास विधिज्ञ श्री. व्ही. एम. बापट

०१. गुळबेली शिवारामध्ये सुनिल नागपुरे यांचे घर असून त्यावर दत्त भवन असे लिहीलेले आहे. मला घटनेबद्दल काही माहिती नाही. असे काही घडले नाही की माझ्या समक्ष वनविभागाच्या अधिका-यांनी अवैध वाळूवाहतुकीचा ट्रॅक्टर दिनांक १४/१०/२०१७ रोजी पकडला व तो जप्त करत असतांना आरोपींनी त्यांची अडवणूक केली. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नाही.

***(साक्षीदार अभियोग पक्षाला मदत करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्याला फितूर घोषित करून उलट तपास करण्याची परवाणगी मागीतली ती देण्यात आली.)***

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/१०/२०१७ रोजी सकाळी ८.३० वाजता वनविभागाच्या कर्मचा-यांनी दत्त भवन जवळ आरोपींचे ट्रॅक्टर अडविले व त्यावेळी मी तेथे जावून त्यांना विचारपूस केली असता त्यांनी मला सांगितले की आरोपींनी फिर्यादीला मारहाण करून ट्रॅक्टर त्यांच्या ताब्यातून घेवून गेले. माझ्या बयालातील अधोरेखांकित भाग अ मला वाचून दाखविला तो मी पोलिसांना सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. मानसिंग

शामा चव्हाण हे माझे वडिल होते ते ५ ते ६ वर्षांपुर्वी मरण पावले.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. एस. डी. रावत</u>**

नाकारला.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by RAJENDRAKUMAR BABASAHEB GIRI
Date: 2025.12.18 11:09:56 +0545

मलकापूर.

दिनांक - १७/१२/२०२५

**(आर. बी. गिरी)**

अतिरिक्त सत्र न्यायाधीश मलकापूर

**CERTIFICATE**

I certify that this order P.D.F. uploaded is a true and correct copy of original signed order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Adhoc District Judge – 1 & Additional Sessions Judge, Malkapur. |
| Name of Stenographer | : | Shri. V. S. Jadhav. (Junior Clerk) |
| Date of order | : | 17.12.2025 |
| Date of signed on order by Judicial Officer | : | 17.12.2025 |
| Date of uploading | : | 18.12.2025 |